# घोषणा

## वन सेवा व लिपिक-टंकलेखक परीक्षांसाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ

**जाहिरात क्रमांक ०४/२०१७-महाराष्ट्र वन सेवा (पूर्व) परीक्षा-२०१७ व जाहिरात क्रमांक ०५/२०१७-लिपिक-टंकलेखक [मराठी/इंग्रजी] (पूर्व) परीक्षा-२०१७** या पदांकरीता ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख दिनांक २६/०४/२०१७ अशी आहे. परंतु काही तांत्रिक कारणांमुळे उमेदवारांना येणा-या अडचणी लक्षात घेता, प्रस्तुत दोन्ही जाहिरातींकरीता ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेत दोन दिवसांची म्हणजेच दिनांक २६ ऐवजी २८ एप्रिल, २०१७ पर्यन्त मुदतवाढ देण्यात येत आहे -

१. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

२. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २९ एप्रिल, २०१७ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २६/०४/२०१७**

**सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**